R.No. MHAMAR/25/A3029

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १०३

दि.०३ एप्रिल २०२६,वार: शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## दुःख हे केवळ चुकिने वागल्यामुळेच मिळते असे नाही तर कधी कधी अधिक चांगले असण्याने सुद्धा कठीण जाते..!

नवी मुंबई पनवेल:- पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात कांतीलाल प्रतिष्ठान रायगड विश्वव्यापी मराठी साहित्य सांस्कृतिक परिषदेच्या वतीने चौथे राज्यव्यापी मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन डॉ. दीपक पवार (संमेलन अध्यक्ष ) डॉ. बी. जी शेखर पाटील (सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी) श्री कांतीलाल कडू, अँड दिलीप पांढरपट्टे, डॉ, सदानंद मोरे व पद्मश्री पद्मजा फेनानी-जोगळेकर यांचे उपस्थितीत मोठ्या जल्लोसात साजरे करण्यात आले.



सदर साहित्य संमेलनात साहेबराव ठाणगे (कवी संमेलन) यांच्या उपस्थितीत निमंत्रित कवी म्हणून मंगेश विश्वासराव तसेच इतर अनेक कवी सोबतच निमंत्रित कवी म्हणून समाजभूषण मा श्री उत्तमराव दासू तरकसे असरडोहकर (महाराष्ट्र राज्य शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित व करपली भाकरकार ज्येष्ठ साहित्यिक कवी व विचारवंत हे सुद्धा आयोजकांच्या आग्रही निमंत्रणाला मान देऊन उपस्थित राहून त्यांनी त्यांची जीवनाचे गणित नावाची स्वरचित कविता शाओ शाईची नोंद या कवितासंग्रहात प्रसिद्ध झालेल्या कवितेचे उत्कृष्ट सादरीकरण करत उपस्थितांच्या आग्रा खातर आपले मनोगत व्यक्त करताना

दुःख हे केवळ चुकीने वागल्यामुळे मिळते असे नाही,

तर, कधी कधी अधिक चांगले असल्याने सुद्धा कठीण जाते..!

असे प्रबोधनात्मक विचार आपल्या मनोगतात व्यक्त केल्यानंतर आयोजकांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला तसेच इतर कवीने सुद्धा आपल्या बहारदार कवितांचे सादरीकरण करून साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमास रंगत आणली.

सदर कार्यक्रमात कवी संमेलनानंतर पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्या संगीत मैफिलीचे सादरीकरण करण्यात आल्याने सदर साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमात चार चांद लागल्याचे दृश्य दिसून आले सदर कार्यक्रमास रायगड, ठाणे, मुंबई परिसरातून साहित्यिक रसिकांनी खूप मोठ्या प्रमाणात हजेरी लावल्याने नाट्यगृह अगदी खचून भरून गेले होते कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितयांचे आभार कांतीलाल कडू यांनी मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## व्ही एस पँथर्स च्या वतीने सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांना दिले विवाहसोहळ्याचे निमंत्रण

लातूर : येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त १० मे २०२६ रोजी सातवा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे या सोहळ्यातील नवदांपत्यांना शुभ आशीर्वाद प्रदान करण्यासाठी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट साहेब यांना सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते आग्रहाचे निमंत्रण देऊन विवाह सोहळ्यास उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली.



यावेळी सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्यासह पूजनीय भदंत डॉ उपगुप्त महाथेरो बौद्धाचार्य केशव कांबळे रवी कुरील गिरीश पवार यांच्यासह आदीजन उपस्थित होते.

## सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षकांसाठी नामतालिका तयार करण्याची प्रक्रिया सुरु; ६ एप्रिलपासून ऑनलाईन अर्जाचे आवाहन

लातूर(जिमाका): महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१(१) (ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६९ (१) (फ) मधील तरतुदीनुसार, सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी सन २०२६-२०२८ या कालावधीची राज्यस्तरीय लेखापरिक्षकांची नवीन नामतालिका तयार करण्यात येणार आहे. या प्रक्रियेसाठी इच्छुक उमेदवारांकडून ६ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

पात्र लेखापरिक्षकांनी https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या संकेतस्थळावर जाऊन विहित मुदतीत आपले अर्ज सादर करावेत. ऑनलाईन अर्जासंदर्भातील सविस्तर परिपत्रकीय सूचना सहकार विभाग, सहकार आयुक्त व निबंधक यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच, या सूचनांची प्रत सर्व जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरिक्षक आणि विभागीय सहनिबंधक यांच्या कार्यालयामध्येही इच्छुकांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे. तरी संबंधित व्यावसायिक आणि संस्थांनी या संधीचा लाभ घेऊन वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा उपनिबंधक व्ही. एल. पोतंगले यांनी केले आहे.

## मान्सूनपूर्व नाले सफाई व अतिक्रमणासंदर्भात बैठक

लातूर/ प्रतिनिधी: मान्सून पूर्व नालेसफाई आणि शहराच्या चारही बाजूंनी जाणाऱ्या रिंग रोडवरील अतिक्रमणे या संदर्भात महापौर जयश्री सोनकांबळे व मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.



उपमहापौर स्नेहल उटगे, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त वसुधा फड,वंचित बहुजन आघाडीचे गटनेते अमोल लांडगे यांचीही या बैठकीस उपस्थिति होती.

आगामी पावसाळ्याच्या दृष्टिकोनातून मान्सूनपूर्व नाले सफाईचा आराखडा तयार करावा अशा सूचना या बैठकीत संबंधित विभागांना देण्यात आल्या. प्रत्येक प्रभागात हमला पद्धतीने नालेसफाई करावी. यासाठी महानगरपालिकेत आपत्कालीन कक्षाची स्थापना करावी. शहरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरणार नाही, याची दक्षता घ्यावी. धोकादायक झाडे व फांद्या तोडाव्यात.मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींच्या ठिकाणी सूचना फलक लावावेत. रस्ते दुभाजकातील कचरा उचलून ते स्वच्छ करावेत, अशा सूचना यावेळी करण्यात आल्या. स्वच्छता विभाग व बांधकाम विभागाने मान्सूनपूर्व नाले सफाईची कामे त्वरित सुरू करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले.

शहराच्या बाहेरून जाणाऱ्या रिंग रोडवर अतिक्रमणे होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्या अनुषंगाने अतिक्रमणे झाली आहेत की नाही? याचे सर्वे क्षण करून ८ दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेशही या बैठकीत देण्यात आले.

यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी रवी कांबळे, संतोष लाडलापुरे, समाधान सूर्यवंशी, विजय राजुरे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, धोंडीबा सोनवणे, शिवराज शिंदे,अक्रम शेख यांच्यासह सर्व १८ प्रभागांचे स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

## 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत लातूरला निवासी क्रीडा निपुणता केंद्र;थलेटिक्स व कुस्ती खेळाडूंची ७ व ८ एप्रिल रोजी नैपुण्य चाचणी

लातूर (जिमाका): राज्यातील क्रीडा विकासाला चालना देण्यासाठी आणि जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्यासाठी राज्य शासनाने 'मिशन लक्ष्यवेध' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. या योजनेअंतर्गत लातूर विभागामध्ये थलेटिक्स व कुस्ती या दोन क्रीडा प्रकारांचे 'निवासी विभागीय क्रीडा निपुणता केंद्र' सुरू करण्यात येणार आहे. या केंद्रामध्ये प्रवेश मिळवण्यासाठी अर्ज केलेल्या आणि छाननी अंती पात्र ठरलेल्या खेळाडूंची क्रीडा नैपुण्य चाचणी ७ व ८ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, आधुनिक पायाभूत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र आणि खेळाडूंना करिअर मार्गदर्शन अशा विविध घटकांच्या विकासासाठी 'मिशन लक्ष्यवेध' योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. याअंतर्गत लातूर येथे होणाऱ्या चाचणीसाठी थलेटिक्स प्रकारातील पात्र खेळाडूंनी ७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता पोलीस मुख्यालय मैदान, बाभळगाव येथे उपस्थित राहायचे आहे. तसेच कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी पात्र खेळाडूंची चाचणी जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथील कुस्ती हॉलमध्ये ७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेपासून सुरू होईल. ही चाचणी प्रक्रिया ७ व ८ एप्रिल असे दोन दिवस चालणार आहे.

सर्व पात्र खेळाडूंना यापूर्वीच सूचनापत्रे पाठविण्यात आली आहेत. तरी थलेटिक्स आणि कुस्ती या दोन्ही प्रकारातील पात्र खेळाडूंनी निश्चित केलेल्या वेळेत आणि स्थळी आपल्या क्रीडा साहित्यासह नैपुण्य चाचणीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर विभागाचे क्रीडा व युवक सेवा उपसंचालक महादेव कसगावडे यांनी केले आहे.

## महाराष्ट्रातील जीएसटी महसुलात १२.६ टक्क्यांची वाढ; राज्याच्या कर महसुलात विभागाचा दोन-तृतीयांश वाटा

मुंबई : वित्तीय वर्ष २०२५-२६ दरम्यान महाराष्ट्र राज्य जीएसटी विभागाने उल्लेखनीय महसूल कामगिरी नोंदवली आहे. वस्तू व सेवा कर (ऋढढ), मूल्यवर्धित कर (तढ) आणि व्यवसाय कर (झढ) यांमधून एकूण २,५१,२५६ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला असून, मागील वर्षाच्या २,२३,०८७ कोटी रुपयांच्या तुलनेत १२.६ टक्के वाढ झाली आहे.राज्यांमधील जीएसटी महसूल संकलनात महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. दुसऱ्या क्रमांकाच्या राज्याच्या तुलनेत येथील महसूल दुपटीपेक्षा अधिक आहे. तसेच, राज्यातील जीएसटी महसूल वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत १४.६ टक्क्यांनी वाढून १,८६,९९१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

राज्याच्या मजबूत अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब म्हणून जीएसटी महसुलातील ही वाढ देशातील उच्च वाढ दरांपैकी एक असून, ती राष्ट्रीय सरासरीपेक्षा जवळपास दुप्पट आहे. जीएसटी, व्हॅट आणि व्यवसाय कर मिळून महाराष्ट्राच्या राज्याच्या स्वमालकीच्या कर महसुलात (डजढठ) सुमारे ६४ टक्के योगदान देतात, यावरून राज्य जीएसटी विभागाची वित्तीय बळकटीत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित होते.

विभागाने सलग चौथ्या वर्षी आपला अर्थसंकल्पीय अंदाज (इए) ओलांडत १००.२ टक्के लक्ष्य साध्य केले आहे. जीएसटी दर संयुक्तिकरणामुळे निर्माण झालेल्या काही अडचणींनंतरही विभागाने सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सुधारित अनुपालनाच्या जोरावर या आव्हानांवर मात करत १४.६ टक्क्यांची भक्कम वाढ नोंदवली आहे.

जीएसटी व्यवस्थेअंतर्गत झालेली ही मजबूत वाढ दर संयुक्तिकरणानंतर वाढलेल्या देशांतर्गत उपभोगामुळे तसेच कर प्रशासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शक्य झाली आहे.महाराष्ट्र राज्य जीएसटी विभागाने डेटा-आधारित अभिप्राय यंत्रणा, प्रगत विश्लेषणावर आधारित अंमलबजावणी, उच्च जोखमीच्या करदात्यांवर अधिक लक्ष, तसेच प्रामाणिक करदात्यांसोबत सातत्यपूर्ण संवाद यांसारख्या विविध सुधारणा उपाययोजना राबवल्या आहेत. यासोबतच, 'ईज ऑफ डुईंगबिझनेस' (एरीश ेष ऊेळपस ईीळपशीी) सुधारण्यावरही विभागाचा सातत्याने भर असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली आहे.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

# विशेष स्तंभः अंतर्नाद

१. ऋणानुबंधः एक कृतज्ञतापूर्वक सुरुवात– आज हनुमान जयंतीच्या या मंगल समयी, जेव्हा मी आपल्या समाजाचा उत्साह आणि प्रशासकीय यंत्रणेची धावपळ पाहतो, तेव्हा मला एक खोलवर अभिमान वाटतो. पण या उत्सवाच्या गदारोळात मी जेव्हा स्वतःच्या अंतर्मनात डोकावतो, तेव्हा मला जाणीव होते की, हे केवळ एक 'सेलिब्रेशन' नाही. हा तर एक प्रवास आहेज्या समाजाने आणि निसर्गाने आपल्याला घडवले, त्या मातीचे ऋण फेडण्यासाठी स्वतःला पुन्हा एकदा समर्पित करण्याचा. हा उत्सव म्हणजे मला आणि तुम्हांला मिळालेली एक अशी संधी आहे, जिथे आपण आपल्या सार्वजनिक कर्तव्याला आध्यात्मिक अधिष्ठान देऊ शकतो.

२. मूळ तत्त्वज्ञानः वेगातील हरवलेली जाणीव–मनोजवं मारुततुल्यवेगमंहनुमानजींचा वेग मनासारखा आणि वाऱ्यासारखा आहे. आजच्या जगात मी पाहतोय की, आपणही तोच वेग धारण केला आहे. पण हा वेग आपल्याला कुठे नेतोय? आपण शक्तिशाली झालो आहोत, पण शहाणे झालो आहोत का? आपण 'कनेक्टेड' आहोत, पण 'कॉन्शस' आहोत का? मला असे वाटते की, आपण आज 'इंपल्स' (आवेग) द्वारे चाललो आहोत, 'पर्पज' (उद्देश) द्वारे नाही. निसर्गाचा ऱ्हास आणि मनाची अस्वस्थता ही केवळ बाहेरची संकटे नसून, आपल्या अंतर्मनातील हरवलेल्या संतुलनाचे प्रतिबिंब आहेत, असे मला प्रामाणिकपणे वाटते.

३. कृतीशील उत्तरदायित्वः आचरणातील शुद्धता–हनुमानजींना आपण 'जितेंद्रिय' म्हणतोज्यांनी स्वतःच्या इंद्रियांवर विजय मिळवला. जेव्हा मी आजच्या चंगळवादाकडे पाहतो, तेव्हा मला जाणवते की खरी ताकद दुसऱ्यावर राज्य करण्यात नाही, तर स्वतःच्या उपभोगावर मर्यादा घालण्यात आहे. माझ्या लेखी, मारुतीरायाची भक्ती ही केवळ मंदिरात दिवा लावण्यापुरती मर्यादित असूच शकत नाही. जर मी नदी प्रदूषित करत असेन आणि त्याच वेळी देवाला अभिषेक करत असेन, तर ती भक्ती नाही, तो एक विरोधाभास आहे. आपल्या भागीदारीतील खरा 'डिलिव्हरेबल' (अंतिम परिणाम) हा आपल्या दैनंदिन आचरणात उतरला पाहिजे. कोणीही मागे राहू नये हा विचार जेव्हा माझ्या कृतीतून दिसेल, तेव्हाच मी स्वतःला खरा रामदूत म्हणवून घेऊ शकेन.

४. दूरगामी दृष्टीकोनः सुसंवादाचा वारसा– हा बदल एका रात्रीत होणार नाही, याची मला कल्पना आहे. त्यासाठी आपल्याला सातत्य आणि संयम हवा. जेव्हा आपण निसर्गाशी आणि स्वतःशी सुसंवाद साधतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाजात 'वास्तविक सुसंवाद' निर्माण होतो. हनुमानजींचे आयुष्य हा केवळ एक इतिहास नाही, तर तो आपल्यासाठी 'कॉन्शस लिविंग'चा (जाणीवपूर्वक जगण्याचा) एक ब्ल्यू प्रिंट आहे. आपण निसर्गाचे मालक नसून त्याचे 'केअरटेकर' आहोत, ही जाणीवच आपल्याला भविष्यातील संकटांपासून वाचवू शकेल.

५. संकल्पाचे पाऊलः उपासनेकडून प्रकटीकरणाकडे–शेवटी, हे माझे विचार कोणावर लादण्यासाठी नाहीत, तर हा माझ्या स्वतःच्या संकल्पाचा एक भाग आहे. मला असे वाटते की, आपण सर्वांनीच आता घाई सोडून, शांतपणे स्वतःशी संवाद साधण्याची हीच ती वेळ आहे. या हनुमान जयंतीला आपण केवळ त्यांच्यासमोर नतमस्तक न होता, त्यांच्यातील गुण आपल्यात कसे उतरतील, याचा शोध घेऊया.

कारण, मानवतेचे आणि आपल्या धरणीमातेचे भवितव्य आपण कोणाची पूजा करतो यावर नाही, तर आपण 'काय बनतो' यावर अवलंबून आहे.

# लोहार पाणक्या ने राजाला शिकवला धडा

ब्राह्मण इतरांपेक्षा खूप ज्ञानी व बुद्धिमान असतात म्हणून त्यांना सर्वच क्षेत्रात जास्त नोकऱ्या दिल्या जातात. वास्तविक तो त्यांच्या योग्यतेचा सन्मानच आहे.असा समज मनुवादी विचारधारेच्या लोकांनी करून ठेवला. म्हणूनच एक म्हण प्रसिद्ध आहे ब्राह्मण किती ही झाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ त्याला राजर्षी शाहू महाराज यांनी खोडून काढण्यासाठी गंगाराम कांबळेंना चहाचे दुकान काढण्यास शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले.ते स्वत: या दुकानात जात व गंगाराम चहा आण अशी ऑर्डर पुकारीत.महाराज चहा घेऊ लागल्यामुळे सोबतच्या मंडळींनाही तिथे चहा घेणे भाग पडे. हाताशी असलेली राजसत्ता दलितांच्या वस्त्या सुधारू शकत नसेल, तर त्याचा उपयोग काय ? याची जाणीव असलेला लोकराजा म्हणजे राजर्षी शाहू महाराज यांना झाली होती.ते त्यांनी आपल्या संस्थान मध्ये सर्व समाजाला शिक्षणात नोकरीत विशेष सवलती देऊन समान न्याय समान अधिकार दिला हा इतिहास काही लोक विसरतात.

शेतकरी शेतमजूराच्या मुलाने सरकारी नोकरीसाठी परीक्षा दिली त्यात तो पास झाला तर कशी मानसिकता काम करते त्याचे अनेक उदाहरण वृत्तपत्रात वाचले असतील.शेतमजूर म्हणजे अशी व्यक्ती जी स्वतःच्या शेताऐवजी दुसऱ्याच्या शेतात किंवा शेती व्यवसायात (पशुपालन, मशागत, कापणी इ.) शारीरिक श्रम करून रोख रक्कम किंवा वस्तूंच्या स्वरूपात मजुरी मिळवते.हे मजूर प्रामुख्याने भूमिहीन असून रोजंदारी किंवा हंगामी तत्त्वावर काम करतात.जे लोक शेतीतील विविध कामांसाठी रोजनदारी वर काम करतात, त्यांना शेतमजूर म्हणतात.जमिनीची मशागत,पेरणी,कापणी, पिके काढणे,पशुधन सांभाळणे आणि इतर शेतीविषयक कामे करणे हे मजूर प्रामुख्याने त्यांच्या शारीरिक श्रमावर आणि रोजंदारीवर जगतात. भूमिहीन शेतमजूर ज्यांची स्वतः ची जमीन नाही.आणि अल्पभूधारक ज्यांची जमीन कमी आहे आणि जे दुसऱ्यांच्या शेतातही काम करतात.ग्रामीण अर्थव्यवस्थेत हे सर्वात असुरक्षित,असंघटित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट मानले जातात.शेतमजूर हे भारतीय शेतीचा कणा आहेत,तरीही त्यांना अनेकदा सामाजिक आणि आर्थिक संकटांना सामोरे जावे लागते. यामुळेच त्यांच्या मुलाचे शिक्षण नववी दहावी च्या पुढे जात नाही.ज्याने कोणी जिद्धीने शिक्षण घेतले तरी नोकरी मिळेलच यांची शास्वती नसते. तेव्हा तो जे काम मिळेल ते करून वाटचाल करत असतो.तेव्हा सुरक्षित नोकरी करणाऱ्या सुरक्षित ठिकाणी राहणाऱ्या लोकांच्या पोटात गोळा उठतो. कारण त्यांच्या मुलांना सर्व सुख सुविधा आणि बौद्धिक प्रशिक्षण देणारे कल्लास लावले असतांना ही विजयी होत नाही, त्यामुळेच त्यांना कष्टकरी शेतकरी शेतमजुरांच्या मुलांचा जिद्दीने कष्ट करून मिळविलेला विजय पचत नाही. ते कौतुक तर करत नाहीत, उलट आम्हाला ही आता शेतकरी,शेतमजूर झाले पाहिजे,तरच आमचे मुले स्पर्धा परीक्षेत,पोलीस भरती परीक्षेत पास होतील अशी प्रतिक्रिया व्यक्त करता, त्याना शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना सरकारी नोकरी मिळाली की असे शब्द काय संकेत देत असतात. बुद्धिमान असणे हे विशिष्ट समाजाची जन्मजात मक्तेदारी असते.असा समज त्यांनी सर्वच क्षेत्रात करून ठेवला. तो कसा खोटा आहे हे एका राजाला लोहार पाणक्याने बुद्धिमतेने करून दाखवला.त्यासाठी ही एक बोध कथा वाचा.

एकदा विराटनगरीचा राजा चंद्रभान याने राज्यातील लोकांमध्ये जमिनीचे वाटप केले. त्यांनी शेतकरी व मजूरांना कमी जमीन दिली व ब्राह्मणांना खूप जास्त जमीन दिली. ते पाहून लोकांनी राजाला 'असे का' असा प्रश्न केला.राजाने स्पष्टीकरण दिले की, ब्राह्मण इतरांपेक्षा खूप ज्ञानी व बुद्धिमान असतात म्हणून त्यांना जास्त जमीन देणे योग्य आहे. वास्तविक तो त्यांच्या योग्यतेचा सन्मानच आहे.ते ऐकून आपली पाळी येण्याची वाट पाहात उभ्या असलेल्या लोहाराला व पाणक्याला राग आला. दोघे मित्रही होते. त्यांनी आपसात बोलून राजाला धडा शिकवण्याचे ठरवले. जेव्हा लोहाराचा नंबर आला तेव्हा त्याला राजाने 'तुझ्या कामासाठी किती जमीन लागेल?' असे विचारले. लोहार म्हणाला,'मला लोखंडी घन व कानात जेवढे अंतर आहे तेवढी जमीन पुरेशी आहे.' हाच प्रश्न पाणक्याला विचारला तर तो म्हणाला, 'महाराज एका मोटेतील पाण्याने जेवढी जमीन ओली होईल तेवढी जमीन मला पुरेशी आहे.' राजाला त्यांचे बोलणे समजले नाही पण असे वाटले की, या दोघा मूर्खांनी तर खूपच कमी जमीन मागितली आहे. त्याने त्या सेवकांना त्यांना हवी तेवढी जमीन मोजून देण्याची आज्ञा दिली.

जेव्हा सेवक जमीन मोजू लागले तेव्हा लोहार म्हणाला, 'माझ्या लोखंडाच्या घनाचा आवाज ज्या जागेपर्यंत ऐकू येईल तिथपर्यंतची जमीन मला हवी.' पाणक्या म्हणाला, 'एक मोट पाणी जेवढ्या जमिनीवर शिंपडता येईल तेवढी जमीन मला हवी.' चकित झालेल्या सेवकांनी ती गोष्ट राजाला सांगितली. राजा म्हणाला, 'तुम्ही तर खूपच जमीन कमी जमीन मागत होता, आता सेवकांना का त्रास देता? याची शिक्षा तुम्हाला माहीत नाही का?'. दोघे म्हणाले, 'माहीत आहे महाराज.' नंतर लोहार म्हणाला, 'महाराज, मी तर तेवढीच जमीन मागितली जेवढे घन आणि कानात अंतर आहे. सेवक ते ऐकतच नाही. मी चुकीची मागणी केली का?' नंतर पाणक्या म्हणाला, 'महाराज, मीही मोटभर पाण्याने जेवढी जमीन ओली होईल तेवढीच जमीन मागितली. त्यात माझी काय चूक?'

राजा लोहाराच्या आणि पाणक्याच्या हुशारीमुळे चकित झाला. त्याला त्यांच्या मर्जीची जमीन मोजून द्यावीच लागली. तो म्हणाला, 'हे दोघे तर ब्राह्मणांपेक्षाही बुद्धिमान आहेत. यांना प्रत्येकी दहा सुवर्णमुद्रा बक्षीस द्या.' ते दोघे म्हणाले,' महाराज, आम्हाला जमीनही नको आणि बक्षीसही नको. आम्ही फक्त हेच सांगू इच्छितो की, आपण स्वतः शेती न करणाऱ्या व इतरांच्या दानावर जगणाऱ्या ब्राह्मणांना जास्त जमीन देत आहात व जो जीवापाड कष्ट करून राज्याला सुखी करतो त्या मजूर,शेतकरी व कारागीरांना कमी जमीन देत आहात.' हे योग्य न्याय नाही. म्हणूनच आम्ही आमची बुद्धिमत्ता आपल्याला दाखवली.

राजा म्हणाला, 'बुद्धिमत्ता ही एखाद्या विशिष्ट वर्गाकडेच नसते याची तुम्ही मला जाणीव करून दिली. मला माफ करा. यापुढे मी कोणत्याही प्रकारचा पक्षपात करणार नाही. असे मी वचन देतो. तसेच यापुढे राज्यकारभारात तुमच्याशीही सल्लामसलत करीन.' आज कृषीप्रधान भारत देशातील शेतकरी, शेतमजूर यांची कदर केली जात नाही.अति पावसामुळे महापुर येऊन व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे खूप नुकसान करते.पण त्यांची नोंद सरकारी नोकरी करणारे प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी स्वतः ला खूप बुद्धिमान समजून त्यांची नोंद घेत नाही.ते मात्र नोकरी वर असतांना आणि सेवानिवृत्त नंतर ही शासनाच्या अनेक योजनेचा लाभ घेत असतात. त्यांच्यासाठी सरकारी तिजोरीत असलेला पैसा त्यांच्या मेहनतीने गोळा झाला आहे. असा त्यांचा समज असतो. आणि शेतकरी, शेतमजुरांच्या योजनेसाठी सरकारच्या तिजोरीतून जाणारा पैसा फुकट दिला जातो असा त्यांचा एकूण कर्मचारी अधिकारी वर्गाचा समज असतो.आणि तेच सत्ताधारी मंत्रिमंडळात बुद्धीकौशल्य वापरून आम्ही किती बुद्धिमान आहोत हे सिद्ध करतात.मग काय होते हे आपण पाहिले वाचले असेल की शेतकरी, शेतमजुरांना दिली जाणारी कर्जमाफी देशाचे नुकसान करणारी आहे,आणि उद्योगपतीला दिली जाणारी कर्जमाफी देशाच्या हितकारक आहे. हे रिजर्व बँक चे आर्थिक संचालक सल्लागार सांगतात. ही देशातील बुद्धिमान समाज म्हणून ओळख असणाऱ्या समाजाची खरी बुध्दीमत्ता आहे. ती भारतीय संविधान निर्मात्याने मोडून काढली आहे. पण ती पूर्णपणे निघाली नाही हे इमानदार सेवक,चौकीदार,शेपन्न इंच छाती असणाऱ्या महा पराक्रमी विश्वगुरू ने वेळोवेळी दाखवून दिले आहे. शेतकरी,शेतमजूर कामगार,बेरोजगार तरुणांनी त्याला धडा शिकवला पाहिजे होता.पण प्रत्येक वेळा बुद्धीमत्ता असलेला समाज बुद्धीकौशल्य कट कारस्थान करून बहुसंख्य समाजाची फसवणूक करत आला आहे. त्याला अद्दल घडविण्यासाठी धडा शिकविण्यासाठी लोहार पाणक्या सारखी शेतकरी शेतमजूर पुढे आले पाहिजे.

**सागर रामभाऊ तायडे,९९२०४०३८५९,भांडूप मुंबई,**

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून युवकांना स्वावलंबनाची संधी उद्योगमंत्री उदय सामंत

# उद्योग विभागाची उल्लेखनीय कामगिरी

मुंबई : राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (उचएत्रझ) अंतर्गत आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये युवकांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी प्रोत्साहन देत मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती साध्य करण्यात उद्योग विभागाला उल्लेखनीय यश मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांनी दिली.

उद्योग संचालनालयाच्या आकडेवारीनुसार, राज्यासाठी ३० हजार अर्जांचा लक्ष्यांक ठेवण्यात आला होता. त्यापैकी २५ हजार ५८७ अर्जांना बँकांकडून मंजुरी मिळाली असून ८५.२९ टक्के लक्ष्यपूर्ती साध्य झाली आहे. तसेच ६ हजार १९३ प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष कर्ज वितरण होऊन २१ हजार ३५६.९८ लाख रुपयांचा निधी युवक उद्योजकांपर्यंत पोहोचला आहे. उर्वरित प्रकरणांची कर्ज वितरण प्रक्रिया सुरू असल्याचे मंत्री डॉ.सामंत यांनी सांगितले.

उद्दिष्टपूर्तीत सांगली जिल्हा राज्यात अव्वल ठरला असून कोल्हापूर,



हिंगोली, रत्नागिरी, धाराशिव, लातूर, अमरावती, गडचिरोली, जळगाव आणि वाशीम या जिल्ह्यांनी १०० टक्क्यांहून अधिक उद्दिष्टपूर्ती साध्य करत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.

ही योजना केवळ आर्थिक सहाय्य देणारी नसून युवकांना स्वावलंबी बनविण्याचे प्रभावी साधन ठरत आहे. यामुळे स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी भांडवल उपलब्ध होत असून स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती वाढते, ग्रामीण व अर्धशहरी भागातील उद्योगांना चालना मिळते आणि कौशल्याधारित व्यवसायांना प्रोत्साहन मिळत आहे. परिणामी स्थलांतर कमी होऊन स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होत असल्याचे दिसून येते.

गडचिरोली जिल्ह्यात शंभर टक्के उद्दिष्टपूर्ती नक्षलवादासाठी ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता 'देशातील स्टील हब' म्हणून उदयास येत आहे. मोठ्या उद्योगांसोबतच लघु व सूक्ष्म उद्योगांची वाढ होत असून स्थानिक युवक मोठ्या प्रमाणावर उद्योजकतेकडे वळत आहेत. उचएत्रझ अंतर्गत जिल्ह्याने १०० टक्क्यांहून अधिक उद्दिष्टपूर्ती साध्य केल्याने या सकारात्मक बदलाला अधिक बळ मिळाले आहे.

उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत यांनी सांगितले की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना युवकांसाठी परिवर्तनाची मोठी संधी ठरत आहे. प्रशासन, बँका आणि युवकांच्या एकत्रित प्रयत्नातून या योजनेची यशस्वी अंमलबजावणी शक्य झाली आहे. भविष्यात अधिक व्यापक स्तरावर ही योजना राबवून प्रत्येक इच्छुक युवकापर्यंत उद्योगाची संधी पोहोचवण्याचा संकल्प आहे.

या उपक्रमामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना बळकटी मिळत असून 'आत्मनिर्भर महाराष्ट्र' घडविण्याच्या दिशेने राज्याने भक्कम पाऊल टाकल्याचेही उद्योगमंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले आहे.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग ०३ एप्रिल रोजी बंद राहणार

लातूर (जिमाका) : गुड फ्रायडेनिमित्त शुक्रवार, ३ एप्रिल, २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग शुक्रवार, ०३ एप्रिल, २०२६ रोजी बंद राहील. तसेच शनिवार, ४ एप्रिल, २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

# युसुफवडगात रात्रीतून बसवेश्वरांचा अश्वारूढ पुतळा उभारला,अज्ञातांविरुद्ध गुन्हा नोंद

केज, : तालुक्यातील युसुफवडगाव येथे ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोर रात्रीतून अज्ञात कार्यकर्त्यांनी बसवेश्वर यांचा अश्वारूढ पुतळ्याची उभारणी केल्याप्रकरणी ग्राम पंचायत अधिकारी प्रदीप नखाते यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमांविरुद्ध युसूफवडगाव पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

युसुफवडगाव येथील ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोर २१मार्च रोजी रात्री ११ वाजेच्या नंतर अज्ञात लोकांनी बसवेश्वर यांच्या पाच ते सहा फुट उंचीच्या अश्वारूढ पुतळ्याची उभारणी केल्याचे निदर्शनास आले. पुतळा उभारण्यापूर्वी या लोकांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाची परवानगी न घेता हा पुतळा त्यांच्या मालकीच्या जागेत उभारल्याचे स्पष्ट झाले. गावातील सरपंच, ग्रामपंचायतीचे सदस्य यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी कोणी पुतळा उभा केला, याची माहिती नसल्याचे सांगितले. तर पुतळ्याचे पावित्र्य न राखता व सुरक्षेची काळजी न घेता पुतळा उभारणी केल्याची फिर्याद ,सोमवारी (दि. ३१ ) ग्रामपंचायत अधिकारी प्रदीप नखाते यांनी दिल्यावरून अज्ञात व्यक्तिविरुद्ध युसूफवडगांव पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार सीताराम डोंगरे हे पुढील तपास करीत आहेत

# धम्म उपासिका विशाखाताई थोरात यांचे जपानला हृदयविकाराच्या झटक्याने अकस्मात दुःखद निधन

विशेष प्रतिनिधी कल्याण- ठाणे



जिल्ह्यातील कल्याण येथे राहणाऱ्या आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या धम्म उपासिका यांची अत्यंत दुःखद बातमी समजली की, बुद्धभूमी फाउंडेशनच्या सभासद,उपासिका विशाखाताई थोरात यांचे दि. १ एप्रिल २०२६ रोजी जपान येथे सहलीदरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने अकस्मात दुःखद निधन झाले आहे.

उपासिका विशाखा ताई यांनी बुद्ध,धम्म आणि संघ यांच्याप्रती अपार श्रद्धा ठेवून सामाजिक धार्मिक कार्यात सदैव सक्रिय सहभाग होता.त्यांचे साधेपणा,सेवाभाव आणि धम्मनिष्ठ जीवन सर्वांसाठी प्रेरणादायी होते. त्यांच्या या अचानक जाण्याने समाजाची आणि बुद्धभूमी परिवाराची मोठी हानी झाली आहे.बुद्धभूमी फाऊंडेशनचे भिक्खूसंघ, पेट्रोन मेंबर,लाईफ मेंबर व उपासक उपासिका यांच्या वतीने आम्ही कालकथित विशाखा ताई यांना विनम्र आदरांजली अर्पण करतो. त्यांना सुगति लाभो हीच बुद्ध चरणी प्रार्थना.तसेच,त्यांच्या दुःखद निधनामुळे शोकाकुल झालेल्या थोरात कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.या कठीण प्रसंगी त्यांना धैर्य व सहनशक्ती लाभो. अनिच्चा वत संखारा असे भदंत गौतमरत्न महाथेरो व भिख्खू संघ यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# भारतीय दलित पँथर साजरा करणार समतेच्या संस्कारांचा पंधरवडाः कर्मयोध्दा अंबादास शिंदे

लातूर:भारतीय घटनेच्या माध्यमातून समानतेवर उभा राहिलेला लोकशाहीवादी भारतीय समाज,पुन्हा एकदा विषमतेच्या विषाने गुदमरून टाकण्याचा निष्फळ प्रयत्न आर.एस.एस,प्रणित विविध पक्ष संघटना मोठ्या ताकतीने करीत आहेत.त्यांचे वांझोटे प्रयत्न मोडीत काढण्यासाठी भारतीय दलित पँथर समतेचा संस्कारांचा पंधरवडा कार्यक्रम राबविणार असून,त्याची सुरुवात दिनांक ०६एप्रिल २०२६ रोजी स्मृतीशेष प्रा.नागनाथ गुंडाप्पा स्वामी यांची जयंती साजरी करून करण्यात येणार आहे,११ एप्रिल २०२६ महात्मा ज्योतिराव फुले , १४ एप्रिल विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर , १९ एप्रिल महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करून ह्या समतेच्या पंधरवड्याची समाप्ती केली जाईल, असे भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोद्धा अंबादास सैदू शिंदे यांनी सांगितले.

त्यांनी सांगितले की,गेल्या दीड दशकापासून आर.एस.एस ,प्रणित विविध पक्ष संघटनांच्या माध्यमातून,समाजात असमानतेच्या संस्कारांची विषारी पेरणी विश्वासघाताने छुप्या पद्धतीने बहुजन समाजात केली जात आहे. आणि त्याचाच परिपाक म्हणून समाजात सर्व स्तरात अराजकता, गुन्हेगारी, अशांतता,बेरोजगारी, आणि आणिती,अमानुषता बोकाळल्याचे चित्र आहे.

या आर.एस.एस.चे विषमतावादी कार्यकर्ते अंधभक्त,बऱ्याच दिवसांपासून विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीत सामील होऊन,विविध समाजसेवेचे कार्य करत असल्याचे भासवून बहुजन समाजाला,आंबेडकरी समाजाला भ्रमित करण्याचे कार्य हे लोक मोठ्या सीताफीने करत आहेत. आणि येणकेन प्रकारे मनूला अभिप्रेत असलेली विषमता,अज्ञान,भय,आणि दैववाद,ते पुन्हा या समाजात पेरून मनुवाद-ब्राह्मण धर्म या भारतीय समाजात बळकट करण्याचे दिवा स्वप्न ते पाहत आहेत. आणि त्यासाठी बहुजन समाजातीलच काही अल्पज्ञानी,मतलबी,आत्मसन्मान नसलेल्या लोकांचा वापर करत आहेत.

समतेवर आधारित समाज निर्मिती करण्यासाठी जो संघर्ष वरील समतानायकांनी, समता प्रस्थापित करण्यासाठी केला.त्या संघर्षाचे, त्यांनी घेतलेल्या परिश्रमाचे,आणि त्यांच्या कार्याची जागृती करण्यासाठी म्हणून,वरील महापुरुषांच्या जयंती साजरी करून केला जाणार हा समतेचा पंधरवाडा विविध समाजोपयोगी दिशादर्शक कार्यक्रमाने ओतप्रोत भरलेला असेल.

हा समतेच्या संस्काराचा पंधरवाडा साजरा करत असताना,अनेक समतावादी,समता,लोकशाही,आणि मानवतावादी मूल्यांवर विश्वास असणाऱ्या,पक्ष-संघटनांना सोबत घेऊन, हा समतेच्या संस्काराचा पंधरवाडा संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केला जाईल,असेही भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोद्धा अंबादास सैदू शिंदे यांनी सांगितले.त्याचाच एक भाग म्हणून पूर्ण लातूर जिल्हाभर हा पंधरवाडा मोठ्या दिमाखात फक्त नाचूनच नाही तर विविध समाज उपयोगी कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जाईल,त्यासाठीच्या नियोजन समितीचे अध्यक्ष रणजित आचार्य व ज्येष्ठ पँथर प्रा.शिवशरण हावळे ,भारतीय दलित पँथरचे लातूर जिल्हाध्यक्ष एस.बी.मांदळे हे प्रयत्नशील आहेत असेही त्यांनी सांगितले.

# काला संत करतात तर त्याचे वाटप भगवंत करतो - ह.भ.प श्रीराम महाराज विडेकर

केज ! प्रतिनिधी-*काला करण्याचा अधिकार संतांना आहे मात्र या काल्यामध्ये सहभागी होऊन त्या प्रसादाचे वाटप मात्र स्वतः भगवंत करतो असे प्रतिपादन महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले.*



विडा येथे प्रतिवर्षा प्रमाणे श्री.राजा हनुमान महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याच्या किर्तना प्रसंगी बोलत होते.याप्रसंगी त्यांनी संत निळोबारायांनी अभंगाच्या माध्यमातून देव आणि भक्त एकत्र होऊन काला करतात त्या काल्याचे विशेषत्व सांगणा-या अभंगावर निरूपण केले .

काला करीती संतजन
सवे त्यांच्या नारायण
वाटी आपुल्या निज हस्ते
भाग्याचा तो पावे तेथे
लाही शीत लागे हाती
दोष देखोनिया त्या पळती
निळा म्हणे क्षीराचा बुंद
लगता पावे ब्रह्मानंद
हा अभंग घेतला

भगवंताचे भक्त काला करायला सुरुवात करतात तेव्हा भगवान परमात्माला देखील चैन पडत नाही आणि तो भगवान परमात्मा स्वतःच त्यांच्यामध्ये सहभागी होऊन तो वाटप करतो आणि हा काला जो भाग्यवान आहे त्यालाच प्राप्त होतो. या काल्याचे विशेषत्व असे की त्याचे एक जरी शीत किंवा लाही हाताला लागली तरी सर्व दोष पळून जातात आणि हा प्रसाद प्राप्त झाला तर ब्रह्मानंदाची प्राप्ती होते एवढे सामर्थ्य या काल्याचे आहे असे सांगितले.

याप्रसंगी ह.भ.प मनोज महाराज,ह.भ.प पुरुषोत्तम शास्त्री,ह.भ.प तुकाराम महाराज, मृदंगाचार्य अरुण महाराज, दादा महाराज मेटे,कल्याण आप्पा येवतेकर,रामहरी काटकर,रामहरी आंधळे,सखारामजी कदम,सुनील महाराज आंधळे,बापूराव मेटे यांच्यासह विडा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे,दत्तात्रय ठोंबरे,काका जाधव,बबन पवार,तुकाराम पटाईत,बाळू निर्मळ,बाबासाहेब पटाईत,बळीराम देशमुख,सरपंच सुरज पटाईत,गुणवंत बहुलेकर,कागदे महाराज,जगन्नाथ पटाईत,धनराज पवार, पराक्रम घुटे यांच्यासह परिसरातील भाविक -भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी निवृत्त पोलीस उपअधीक्षक दिलीपरावजी काळे साहेब यांची महाप्रसाद पंगती होती. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी राजा हनुमान प्रतिष्ठान व समस्त युवाजणांनी सहकार्य केले.

# राष्ट्रीय सेवा योजनेतून सेवाभाव जोपासा; नेतृत्व घडते डॉ. मल्लिकार्जुन करजगी

लातूर (प्रतिनिधी) : भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर यांच्या वतीने संचालित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबिर' उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले. विविध उपक्रमांनी परिपूर्ण असलेल्या या शिबिराचा समारोप समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.



या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बालाजी घार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे माजी संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. योगीराज माने, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे माजी संचालक डॉ. दिगंबर नेटके, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपल्या मनामध्ये सेवावृत्ती जोपासली, तर त्यांच्यातून जबाबदार आणि सजग नागरिक घडतात. विद्यार्थी दशेत नेतृत्वाचे गुण विकसित झाले, तर अशा शिबिरांच्या माध्यमातून समाजाला विविध क्षेत्रांत सक्षम नेतृत्व मिळते. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी नेतृत्वाची पायाभरणी अशा उपक्रमांतूनच होत असते. त्यांच्या या विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव आणि नेतृत्वाची जाणीव अधिक दृढ झाली.

यावेळी डॉ. दिगंबर नेटके यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यक्तिमत्त्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना अत्यंत महत्त्वाची असून सेवा वृत्तीने केलेले कार्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास हातभार लावते.

सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. योगीराज माने यांनी आपल्या भाषणातून साहित्यिक दृष्टिकोन मांडत सांगितले की, कविता आणि गझल या सामाजिक जाणिवेतूनच जन्म घेतात. विद्यार्थ्यांमध्ये निस्वार्थ सेवा करण्याची भावना निर्माण झाली, तर ते केवळ चांगले नेतेच नव्हे, तर संवेदनशील साहित्यिकही घडू शकतात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गीता वाघमारे यांनी प्रभावीपणे केले. प्रास्ताविक डॉ. केशव आलगुले यांनी सादर केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, शितल पवार, डॉ. रामेश्वर स्वामी, प्रा. शिवराज बाजुळगे, प्रा. प्रज्ञा स्वाम, श्री. जाधव रामदास, श्री. बजरंग चिवडे, श्री. अमित भालके, श्री. मयूर आवळे, डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, शितल पवार, जयश्री जमादार आदींनी विशेष परिश्रम घेतले. या नेतृत्व विकास शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि नेतृत्व गुणांचा विकास होऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी दिशा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# राजमाता जिजामाता शैक्षणिक.संकुलातर्फे केंद्रे दाम्पत्याचा सत्कार

लातूर : शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत 'नवराष्ट्र'तर्फे एज्युकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व राजमाता जिजामाता एम.सी. व्ही.सी. शाखेच्यावतीने राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्षा के. ए. जायेभाये यांचा गुरुवारी सत्कार करण्यात आला.



यावेळी राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, प्रा. राजकुमार जाधव, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. राजीव मुंढे यांनी स्वागत गीत गायीले. सूत्रसंचालन मदन धुमाळ यांनी केले तर आभार प्रा. बी. बी. खटके यांनी मानले.सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाने गुणवत्तेत गरूडझेप घेतली असून संकुलातर्फे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासोबतच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या संकुलाने अनेक जिल्हाधिकारी, शिक्षक, डॉक्टर, इंजिनिअर घडविले आहेत. या संकुलात २५०० विद्यार्थी शिकत असून १२१ कर्मचारी कार्यरत आहेत. आगामी शैक्षणिक वर्षात १२१ मुली दत्तक घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्मार्ट बोर्ड, इन्ट्रॅक्ट बोर्ड, डिजिटल क्लासरूम, स्मार्ट क्लासरूमच्या माध्यमातून कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच ११वी कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एमएससीआयटीचे शिक्षण देण्यात येणार असल्याची घोषणाही प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केली.

# धाराशिव जिल्ह्यातील चार गुन्हेगारांची टोळी केज पोलिसांनी पकडली

केज, : येथीलं बसस्थानक परिसरात अंधारात लपून गंभीर गुन्ह्याच्या तयारीत असलेली धाराशिव जिल्ह्यातील चौघांची टोळी केज पोलिसांनी पकडली आसून, लाकडी काठी, कोयता, व कार जप्त केली आहे . ते चौघेही अरोपी धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील असून याप्रकरणी केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




केजचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, जमादार सुभाष तांबारे, पोलीस नाईक विष्णू नागरगोजे, वाहन चालक रामहरी शिंदे हे मंगळवारी ( दि ३१ ) मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या दरम्यान केज शहरात गस्त घालीतआसताना व बसस्थानक परिसर चेक करीत आसताना बसस्थानकाच्या बाजूच्या एका कोपऱ्यामध्ये अंधारात एम. एच. १४ एफजी ८८७८ ही कार उभी केल्याचे दिसून आल्याने त्यांनी जवळ जाऊन कारच्या काळ्या रंगाच्या काचेतून आत पाहिले असता चौघे जण संशयितरित्या स्वतःचे अस्तित्व लपवून बसले होते. त्यांना विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिल्याने कारची झडती घेतली असता कारमध्ये कोयता, काठी दिसून आली. ते गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट झाल्याने भूम (जि. धाराशिव) जिल्ह्यातील प्रेम शिवाजी गायकवाड (रा. सुकता), वैभव भागवत गायकवाड (रा. इंदीरानगर, भुम), सुमीत प्रभाकर गायकवाड, हर्षद मिलींद चंदनशिवे (दोघे रा. भोगलगांव) या चार तरुणांना ताब्यात घेतले. तर पोलिसांनी कारसह कोयता, लाकडी काठी जप्त केली. पोलीस नाईक विष्णू नागरगोजे यांच्या फिर्यादीवरून वरील चौघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली चालु आहे.

# रेणुका मातेच्या नवसाच्या गाड्या ओढण्याची ७० वर्षाची परंपरा कायम

केज/प्रतिनिधी–केज



तालुक्यातील शिंदी येथे गेल्या ७० वर्षांची परंपरा कायम ठेवत रेणुका मातेच्या नवसाच्या गाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न झाला आहे .

चैत्र महिन्याच्या सप्तमीला ज्या भाविकांनी नवस केला आहे असे भाविक रेणुका मातेच्या मंदिरात नवस फेडण्यासाठी सलग दहा दिवस देवीची पूजा आराधना करतात अकराव्या दिवशी गाड्या ओढून केलेला नवस फेडला जातो.

रेणुका माता हि नवसाला पावणारी देवी म्हणून गेल्या ७० वर्षांपासून या देवीच्या नवसाची गाड्या ओढण्याची परंपरा आजही कायम आहे.

गेल्या ७० वर्षांपासून चालत आलेली परंपरा ही शिंदी गावासह परिसरातील ग्रामस्थ जपत असल्याचे दिसून येत आहे.

चैत्र महिन्याच्या पौर्णिमेला शिंदी, येवता,घाटेवाडी, गपेवाडी,नामेवाडी येथील भक्त मोठ्या संख्येने गाड्या ओढण्यासाठी रेणुका मातेच्या मंदिरात दहा दिवस नित्यनेमाने देवीची पूजा करून आपला नवस पूर्ण करतात यावर्षी २०५ भक्तांनी आपला नवस गाड्या ओढून पूर्ण केला या सर्व भक्तांची राहण्याची जेवणाची सोय रेणुका माता ट्रस्ट व भाविक मिळून करतात हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील लहान थोर मंडळी मोठ्या श्रद्धेने मनात कुठलेही मतभेद न ठेवता सर्व एकोप्याने हा कार्यक्रम संपन्न करतात यावरून शिंदी ग्रामस्थांचे बाहेरून आलेले यात्रेकरू कौतुक करत होते या कार्यक्रमासाठी गावातील सर्व जाती धर्माचे व सर्व पक्षाचे कार्यकर्ते एकोप्याने हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाहेरगावी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आजच्या दिवशी सर्व ग्रामस्थ गावात जमा होऊन हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करतात.

रेणुका मातेचा आशीर्वाद घेऊन आपल्या ठिकाणाला परत निघून जातात ही परंपरा गेल्या कित्येक वर्षापासून शिंदी ग्रामस्थ व परिसरातील भावी मोठ्या श्रद्धेने जपत आहेत.

# बोधीसत्वाच्या पाऊलखुणा शताब्दी महोत्सव संस्था (नियोजित) कोलमांडले,श्रीवर्धन या संस्थेची कार्यकारिणी जाहीर

विशेष प्रतिनिधी – २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे पुजनीय बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना स्वातंत्र्यापासून दूर ठेवणारा,त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवणारा मनुस्मृती नावाच्या ग्रंथाचे जाहीर दहन करून या देशातील सर्व महिलांना देश स्वातंत्र्य होण्यापूर्वीच अधिकार प्राप्त करून दिले. विषमतेचा नायनाट व समानता प्रस्थापित केली या ऐतिहासिक महिला मुक्ती दिनाच्या पूर्वसंध्येला पुजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे श्रीवर्धन तालुक्यातील कोलमांडले गावी दिनांक २४ डिसेंबर १९२७ रोजी वास्तव्यास आले होते, त्यांच्या पाऊलखुणा या भूमीला लागल्या आहेत आणि त्या ऐतिहासिक घटनेची नोंद घेत संपूर्ण तालुक्यातील तब्बल ४८ गावातील संघटना एकत्रितपणे चिरंतन



स्मरणात राहील असे प्रतीक उभारण्यासाठी एकत्रित झालेले आहेत ही फार मोठी समाधानकारक गोष्ट आहे.

बुधवार दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी वनमाळी सभागृहात दादर येथे झालेल्या जाहीर सभेत कार्यकारी मंडळाची एकमताने निवड करण्यात आली.अध्यक्षः किशोर मोरे,उपाध्यक्षः एस.के.खैरे,प्रदीप मोहिते,विद्यानंद पवार,संजय मोरे,सरचिटणीसः संजयकुमार खैरे,चिटणीसःसंतोष तांबे, किरण जाधव,किशोर पवार,कोषाध्यक्षःसुरेंद्र यादव,उपकोषाध्यक्षः मनोहर जाधव,अंतर्गत हिशोब तपासणीसःअरुण जाधव,मिलिंद तांबे,कार्यकारिणी सभासदःप्रा.संजय खैरे,संदीप जाधव,मिलिंद शिर्के,कुशानंद हळदे,संजय कुडवळकर,राजीव येलवे,शेखर कासारे,राहुल मोरे,विशेष म्हणजे या नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या ऐतिहासिक प्रकल्पाला पुर्णत्वास घेऊन जाण्याची सामुहिक शपथ घेतली.सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात विशेष योगदान असलेल्या सभासदांची कार्यकारिणी जाहीर झाल्याने सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, लातूरच्या थ्रो बॉल संघाची राज्यस्तरावर धडक; विभागीय स्पर्धेत मुलींच्या संघाचे दैदिप्यमान यश

लातूर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'विभागीय शालेय थ्रो बॉल स्पर्धा २०२५-२६' मध्ये लातूरच्या श्री श्री रविशंकर विद्यामंदिरच्या खेळाडूंनी आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. या स्पर्धेत विद्यालयाच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक, तर १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली जागा निश्चित केली आहे.



नांदेड येथे पार पडलेल्या या अटीतटीच्या सामन्यांमध्ये विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट ताळमेळ आणि चिकाटीचे प्रदर्शन केले. विशेषतः १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रतिस्पर्धी धाराशिव संघांना पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. या यशामुळे श्री श्री रविशंकर विद्यामंदिर आणि लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विजयी खेळाडूंची नावे: १. संस्कृती शिवराम मलवाडे (संघनायक) २. अपूर्वा महेश गडगडे (उपसंघनायक) ३. श्रुती गोविंद कुंभार ४. वसुंधरा तानाजी सोनवणे ५. सायली दत्तात्रय धारेकर ६. श्रावणी प्रदीप पंडित ७. अन्वी विनोद डोंगरे ८. श्रावणी लिंबराज चिवडे ९. स्वरा राहुल चव्हाण १०. समृद्धी बालाजी गायकवाड ११. सिद्धी श्रीकृष्ण गडदे १२. हर्षदा चंद्रकांत मोरे

विभागीय स्तरावर चमकदार कामगिरी केल्यानंतर, आता हे १९ वर्षाखालील संघ राज्यस्तरीय थ्रो बॉल स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत. ही राज्यस्तरीय स्पर्धा ७ एप्रिल रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतही आपले खेळाडू लातूरचे नाव उंचावतील, असा विश्वास क्रीडा शिक्षकांनी व्यक्त केला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री राजेंद्र कोळगे, संचालक सदस्या सौ. सुनंदा कोळगे, विद्यालयाचे मुख्याध्यापिका सौ. सोनाली कुलकर्णी उपमुख्याध्यापिका सौ. सुलभा जोशी, कार्यालयिन व्यवस्थापक श्री आशिष कोळगे, क्रीडा शिक्षक सौ. शिला सलगरे श्री दिनेश मानके श्री नरेंद्र स्वामी, प्रशिक्षक अप्पासाहेब स्वामी आणि पालकांनी सर्व खेळाडूंचे व त्यांच्या प्रशिक्षकांचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# युवक काँग्रेसच्या प्रदेश संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार यांची नियुक्ती

लातूरः महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या नव्या प्रदेश कार्यकारिणीत प्रविणकुमार बिरादार यांची प्रदेश संघटन सरचिटणीस म्हणून महत्त्वपूर्ण नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी ही कार्यकारिणी जाहीर केली असून, भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी मनिष शर्मा, राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब, राष्ट्रीय महासचिव व महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा, राष्ट्रीय सचिव व सहप्रभारी नवज्योतसिंग सिंधू आणि राष्ट्रीय सहसचिव शांभवी शुक्ला यांच्या मान्यतेने ही घोषणा करण्यात आली आहे.

१२६ जणांच्या या कार्यकारिणीत संघटन सरचिटणीसपदी निवड झालेल्या प्रविणकुमार बिरादार यांनी संघटनेत तळागाळातून काम करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. युवकांमध्ये मजबूत संघटन उभारणे, कार्यकर्त्यांना एकत्रित ठेवणे आणि सातत्याने पक्षाच्या विचारासाठी झटणे ही त्यांची खास वैशिष्ट्ये मानली जातात.



विशेष म्हणजे, कोणतीही मोठी राजकीय पार्श्वभूमी नसतानाही केवळ मेहनत, निष्ठा आणि संघटन कौशल्याच्या जोरावर त्यांनी हे पद मिळवले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे युवक काँग्रेसच्या संघटनात्मक बळकटीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी देण्याच्या भूमिकेचा हा एक आदर्श नमुना मानला जात असून, प्रविणकुमार बिरादार यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. राज्यभरातून नेते आणि कार्यकर्त्यांकडून त्यांच्या नियुक्तीचे स्वागत आणि कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.